नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४२ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# मतदानातून श्रद्धांजली द्या

## बारामतीत सुनेत्रा पवारांच्या सांगता सभेला सुप्रिया सुळेंचे भावनिक आवाहन

**बारामती : (स. गांवकरी)**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर बारामती विधानसभेची पोटनिवडणूक होत आहे. या पोटनिवडणुकीतील उमेदवार व उपमुख्यमंत्री सुनेत्रवाहिनी यांच्या प्राचारार्थ असलेल्या सांगता सभेला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित राहून उपस्थितांशी संवाद साधला. तसेच अजितदादांना मतदानातून श्रद्धांजली द्या, असे आवाहनही सुळे यांनी केले आहे. यावेळी बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, याठिकाणी येत असताना मी आशाकाकींची भेट घेतली. पण मी सांगता सभेला जात आहे हे त्यांना सांगण्याची हिंमत मला झाली नाही. मागील दोन अडीच महिने आपल्यासाठी खूप कठिण होते, असे सांगितले. आपण वहिनींच्या प्रचारासाठी येथे जमलेले आहोत. अजितदादा आज आपल्यात नाहीत यावर अजूनही विश्वास बसत नाही. घरातील एक कर्ता पुरुष, एक भाऊ आज आपल्यात नाही याचे दुःख कायम राहील असे सांगितले. तसेच महाविकास आघाडीतील नेते, प्रत्येक कार्यकर्ता, आणि बारामतीतील मतदार या



निवडणुकीत वहिनींसोबत ताकतीने उभा राहील असा शब्द दिला.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, मागील सहा दशकापासून बारामती आणि पवार कुटुंबाचे एक वेगळे नाते राहिलेले आहे. बारामतीकरांचे प्रेम आणि विश्वासामुळे येथे एक मोठा विक्रम होणार आहे. ज्या आदरणीय पवार साहेबांना बारामतीने सहा दशके साथ दिली, तेथे या देशात सगळ्यात जास्तवेळा निवडणून येण्याचा मान हा बारामतीकरांना मिळणार आहे. ही परंपरा आपल्या आशीर्वादाने सुरू झाली असे नम्रतापूर्वक नमूद केले.

आदरणीय पवार साहेब येथे कार्यरत होते, त्यानंतर दादांवर येथील जबाबदारी आली. त्यांनी पूर्ण निष्ठेने ३५ वर्षे या भागाची सेवा केली आणि बारामतीची वेगळी ओळख निर्माण केली. अनेक आरोप प्रत्यारोप झाले, संघर्ष झाला पण बारामतीकरांनी कधीही साथ सोडली नाही, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

याच बारामतीकरांसमोर नतमस्तक होऊन महाविकास आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार, काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वतीने या निवडणुकीत वहिनी विजयी होतील असा शब्द दिला. ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी इच्छा होती. त्यामुळे आम्ही उमेदवार देणार नाही, अशी भूमिका घेतली होती.

पण काही लोकांचे अर्ज राहिल्यामुळे ही निवडणूक होत आहे. पण आता होणारे मतदान विक्रमी होईल याबाबत माझ्या मनात कोणतीही शंका नाही, असा विश्वास सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला. तसेच यावेळी मतदान यंत्रावरील एक नंबरवरील वहिनींचे नाव आणि घड्याळ चिन्हासमोरील बटण दाबून दादांना आदरांजली श्रद्धांजली द्या, आणि वहिनींना साथ द्या, असे आवाहनही सुप्रिया सुळे यांनी केले.

## अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर ३२ बालविवाह रोखले : आदिती तटकरे

### बालविवाह मुक्त अभियानात राज्य देशात आघाडीवर

**मुंबई : (स. गांवकरी)**

राज्यात अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास विभागाने 'स्पेशल फोर्स'च्या माध्यमातून मोठी कारवाई करत एकाच दिवशी तब्बल ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळवले असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ नुसार १८ वर्षांखालील मुलगी व २१ वर्षांखालील मुलाचा विवाह लावणे हा दंडनीय गुन्हा असून, बाल विवाह मुक्त राज्य बनविण्यासाठी महिला व बालविकास विभाग बाल विवाह मुक्त भारत हे अभियान राबवित असून, अतिशय कडक कारवाई करत राज्य देशात आघाडीवर आहे.

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर काही भागांत पारंपरिक पद्धतीने अल्पवयीन बालकांचे विवाह लावण्याची प्रथा अद्यापही आढळून येते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने "बाल विवाह मुक्त भारत" या १०० दिवसांच्या अभियानांतर्गत व्यापक जनजागृती, समन्वय आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून यंत्रणा अधिक सजग केली आहे. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, प्रकरण व्यवस्थापन, कुटुंबाचा सातत्याने पाठपुरावा, तसेच शिक्षण, कौशल्य विकास, समुपदेशन आणि पोषण सेवांशी समन्वय साधण्याचे



■ महिला व बाल विकास विभागाच्या 'स्पेशल फोर्स'ची राज्यव्यापी धडक कारवाई

काम या अभियानामार्फत राबविण्यात आले होते. यामध्ये कोकण विभाग (रायगड) – २ बालविवाह, पुणे विभाग (पालघर) – १, नाशिक विभाग – सांगली (१), नाशिक (२), अहिल्यानगर (५), छत्रपती संभाजीनगर विभाग – परभणी (१), लातूर (१), बीड (३), हिंगोली (१), धाराशिव (२), संभाजीनगर (४), बुलडाणा (१), अमरावती विभाग – अकोला (४), नागपूर विभाग – यवतमाळ (२), चंद्रपूर (२) असे एकूण ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळाले. बालविवाह हा केवळ कायद्याचा भंग नसून बालकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे. बालविवाह रोखण्याबरोबरच संबंधित बालिकांच्या पुनर्वसन, शिक्षण आणि संरक्षणासाठीही ठोस पावले विभागामार्फत उचलली जात आहेत.

## थोडक्यात...

### डायग्नोस्टीक सेंटर खासगी संस्थेकडे

मुंबई (स. गांवकरी) : मुंबई महापालिकेच्यावतीने अनेक रुग्णालये खासगी संस्थांना चालवण्यास देण्याचा निर्णय घेतला असून त्यातील बोरीवली पश्चिम येथील पंजाबी गल्लीतील महानगरपालिकेच्या मालकीच्या पंजाबी गल्ली डायग्नोस्टिक्स सेंटर हे आता खासगी संस्थेला चालवण्यास देण्यात येणार आहे. यासाठी क्रस्ना डायग्नोस्टिक्स लिमिटेड या कंपनीला चालवण्यास देण्यात येणार आहे. खासगी सहभाग तत्त्वावर या संस्थेची निवड महापालिकेच्यावतीने करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या मालकीचे बोरीवली पश्चिम येथे पंजाबी गल्ली डायग्नोस्टिक्स सेंटर हे प्लॉट क्र. एफपी नं. ११या ठिकाणी असून तळमजला अधिक दोन मजले अशी एकूण २९८३.१४ चौ. मिटर इतक्या क्षेत्रफळाची जागा बांधून तयार आहे. या ठिकाणी सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर या जागेवर बाह्य रुग्ण विभाग, विविध तपासण्या व चाचण्यासाठी प्रयोगशाळा, डायलेसिस केंद्र, सीटी स्कॅन, एमआरआय स्कॅन महानगरपालिकेने निश्चित केलेल्या व महानगरपालिकेच्या रुग्णांना सध्या लागू असलेल्या दराने सुरू करण्यात येणार आहे.

### पुनर्वसन योजनेला मिळणार गती

पुणे (स. गांवकरी) : महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांसह संपूर्ण शहरातील झोपडपट्ट्यांचे 'जीपीएस' सर्वेक्षण करण्याचा निर्णय झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (एसआरए) घेतला आहे. या माध्यमातून झोपडपट्ट्यांची निश्चित संख्या, त्यातील सद्य:स्थिती, त्यांचे स्थान आदी माहिती उपलब्ध होणार आहे. त्यातून पुनर्वसन योजनेला गती देण्यास मदत होणार आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड शहर झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी १० वर्षांपूर्वी प्राधिकरणाची स्थापना केली आहे. या प्राधिकरणाच्या सुधारीत बांधकाम नियमावलीस राज्य सरकारने नुकतीच मान्यता दिली आहे. या नियमावलीमुळे झोपटपट्टी पुनर्वसनाचे प्रस्ताव दाखल होत आहेत. त्यामध्ये अधिक गती आणि स्पष्टता आणण्यासाठी प्राधिकरणाने हा निर्णय घेतला आहे.

### जमीन वाटणीपत्र फक्त १०० रुपयांत

पुणे (स. गांवकरी) : वडिलोपार्जित शेतजमिनीचे वारसाहक्काने असलेल्या भाऊ-बहिणी, कुटुंबातील सदस्यांची वाटणीपत्र आता केवळ १०० रुपयांत होणार आहे. त्यासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून आकारले जाणारे नोंदणी शुल्क माफ केले आहे. सातबारा उताऱ्यावर नावे वेगळी न झाल्याने कुटुंबांत वाद, खरेदी-विक्रीत अडचणी आणि कायदेशीर गुंतागुंत निर्माण होत असे. म्हणून राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. आता अर्जदाराला तहसीलदारांकडे अर्ज करून किंवा खासगी वाटणीपत्र तयार करून सहज नोंदणी करता येणार आहे.

### नालेसफाईची ३० टक्के कामे पूर्ण

पुणे (स. गांवकरी) : पुणे शहरातील नाले सफाई आणि पावसाळी गटाराच्या स्वच्छतेचे काम सुमारे ३० टक्के पूर्ण झाले आहे. या सुमारे ५० कोटी रुपयांच्या निविदा स्थायी समितीच्या मान्यतेसाठी आलेल्या नाहीत. दरवर्षी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात या निविदा मंजूर होतात. पण आता एप्रिल महिना संपत आला तरीही नालेसफाईच्या निविदा मान्यतेसाठी आलेल्या नाहीत. त्यामुळे याचे गौडबंगाल काय असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## मोदी लोकांना व विरोधी पक्षांना घाबरवतात : खरगे

**कोलकाता/चेन्नई : (स. गांवकरी)**

मंगळवारी चेन्नई येथे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदी यांचा उल्लेख "दहशतवादी" असा केला. मात्र, त्यानंतर काही वेळातच त्यांनी या विधानाबाबत स्पष्टीकरण दिले. दरम्यान, खरगे यांनी आपल्या या वादग्रस्त विधानाबद्दल माफी मागावी, अशी मागणी भाजपने केली. खरगे यांनी यापूर्वीही मोदी यांच्याबाबत वादग्रस्त विधाने केली आहेत. २०२४ मध्ये, त्यांनी पंतप्रधानांची तुलना आक्रमक तैमूर लंग याच्याशी केली होती. २०२३ मध्ये, त्यांनी मोदी यांचे वर्णन "विषारी साप" आणि "झूठों का सरदार" असे केले होते. त्या प्रसंगीही, काँग्रेस अध्यक्षांनी त्यानंतर स्पष्टीकरणे दिली होती. खरगे म्हणाले, "पंतप्रधान मोदी हे लोकांना आणि राजकीय पक्षांना धमकावत आहेत. ते दहशतवादी आहेत, असे मी कधीच म्हटले नव्हते. माझा मुद्दा हा आहे की, मोदी



सतत धमक्या देत आहेत." तमिळनाडू विधानसभेच्या सर्व २३४ जागांसाठी, तसेच पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यात निवडणूक लढवल्या जाणाऱ्या १५२ जागांसाठीचा प्रचार आज संध्याकाळी ५ वाजता संपणार आहे. बंगालमध्ये मतदानाचा दुसरा टप्पा २९ एप्रिल रोजी नियोजित आहे आणि त्याचे निकाल ४ मे रोजी जाहीर केले जातील.

## अजित पवारांच्या अपघाताचे सत्य बाहेर आणणार

### *मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन; सुनेत्रा पवारांच्या प्रचार सभेत विधान*

**पुणे : (स. गांवकरी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बारामती येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रचार सभेत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत मोठे विधान केले. अजित पवारांच्या अपघाताचे सत्य बाहेर येईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही, असे फडणवीस म्हणाले. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतील उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचार सांगता सभेत ते बोलत होते. अजित पवारांच्या अकाली निधनामुळे ही पोटनिवडणूक होत आहे. सुनेत्रा पवार या निवडणूक लढवत असून, त्यांना विक्रमी मतांनी निवडून आणण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. २३ एप्रिल रोजी अजित पवारांच्या स्मृतीस वंदन करून सुनेत्रा पवारांना मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. फडणवीस म्हणाले की, श्रेष्ठ नेते आपल्यातून गेल्यावर निवडणूक बिनविरोध करण्याची परंपरा



आहे. शरद पवारांनी फोन करून सुनेत्रा पवारांना पूर्ण समर्थन असल्याचे सांगितले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. काँग्रेससह अनेक पक्षांनी उमेदवारी मागे घेऊन राज्याच्या संस्कृतीला साजेसे काम केले. ही निवडणूक केवळ एक निवडणूक नसून, दादांसाठी एक स्मृती यज्ञ आहे, असेही त्यांनी नमूद केले.

अजित पवारांनी बारामतीमध्ये विविध विकासकामे उभी केली, तोच वारसा सुनेत्रा पवार पुढे नेतील. दादांच्या पश्चात त्यांनी स्वतःचे दुःख बाजूला सारून जनतेच्या कर्तव्याला प्राधान्य दिले आहे. सुनेत्रा पवारांचा राजकीय अनुभव अलीकडचा असला तरी त्यांचे सामाजिक कार्य मोठे आहे आणि त्यांनी राजकारण जवळून पाहिले आहे. उपमुख्यमंत्री झाल्यापासून त्यांची कार्यक्षमता मी पाहिली असून, दादांची सर्व स्वप्ने पूर्ण करण्याची क्षमता त्यांच्यात आहे, असे फडणवीस म्हणाले.

अनेक वर्ष दादांसोबत मी काम केले एकत्र आल्यावर पुढील १५ ते २० वर्ष काम करण्याचे स्वप्न आमचे होते. रोखठोक व्यक्तिमत्व दादांचे होते, प्रत्येक कामात त्यांनी आपला जीव ओतला होता. गुणग्राहकता, सर्मपित भावना, जिद्द, कामाचा अभ्यास, दूरदृष्टी हे दादांचे गुण होते. सरकारी काम सर्वात्तम दिसले पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. तसेच आर्थिक शिस्त राज्याला लावण्याचे काम त्यांनी केले, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

या प्रचार सभेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मंत्री छगन भुजबळ, उदय सामंत, दत्ता भरणे, हसन मुश्रीफ, संजय बनसोडे, खासदार सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, खासदार पार्थ पवार, खा. शामराव वडकुते, धनंजय मुंडे, जय पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री व्यासपीठावर येण्यापूर्वी त्यांनी शारदा विद्यामंदिरच्या प्रांगणातील मैदानावर अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेऊन अभिवादन केले.

## सामान्य महिलेने भाजपला आरसा दाखवला

### वरळीतील गोंधळावरून विजय वडेट्टीवारांचा

**मुंबई : (स. गांवकरी)**

वरळी येथे महायुतीच्या 'आक्रोश मोर्चा'मुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीत एका सामान्य महिलेने भाजपचे नेते आणि राज्याचे मंत्री गिरिश महाजन यांना खरीखोटी सुनावली. या प्रकरणावरून आता विरोधकांकडून भाजपवर निशाणा साधण्यात येत आहे. "भाजपच्या फोकनाड घोषणांपेक्षा सामान्य महिलेचा 'इथून चालते व्हा' हा एकच आवाज जास्त पॉवरफुल ठरला," अशा बोचऱ्या शब्दांत काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर टीकास्त्र सोडले. भाजपच्या इव्हेंटबाजीला मुंबईकर महिलेने वास्तवाचा आरसा दाखवला असल्याचेही वडेट्टीवार म्हणाले. महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर न झाल्याने महायुतीच्या वतीने काँग्रेससह इतर विरोधी पक्षांविरोधात आज (२१ एप्रिल) वरळीत जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. मात्र, या मोर्चामुळे दुपारच्या सुमारास वरळी आणि आसपासच्या परिसरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली. दुपारी १ च्या सुमारास वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने नागरिक हैराण झाले होते. याच कोंडीत अडकलेल्या एका महिलेचा संताप अनावर झाला आणि तिने गिरीश महाजन यांना झापले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. आता यावरून विरोधकांना भाजपवर टीका करण्याची संधी मिळाली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावर या महिलेचा व्हिडिओ शेअर करत भाजपवर टीकेची झोड उठवली. ते म्हणाले, "भाजपच्या महिला आघाडीला वाटलं असेल की घोषणाबाजीने आसमंत दणाणून सोडला की महिलांचे प्रश्न सुटले! पण भाजपच्या कार्यकर्त्यांना काय माहित, की खरी नारी शक्ती काय असते! त्यांच्या फोकनाड घोषणांपेक्षा सामान्य महिलेचा इथून चालते व्हा हा एकच आवाज जास्त पॉवरफुल ठरला. इव्हेंटच्या कॅमेऱ्यात शक्ती प्रदर्शन शूट होत असताना अचानक सामान्य मुंबईकर महिलेने भाजपला आरसा दाखवला." विजय वडेट्टीवार यांनी भाजपच्या आंदोलनाच्या पद्धतीवरही



प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, "एकीकडे आरक्षणाचे कागदी घोडे नाचवायचे आणि इव्हेंट करणाऱ्याच्या नादात रस्ते अडवायचे, ही कसली पद्धत? कदाचित भाजपला वाटलं असेल की ट्रॅफिकमध्ये अडकल्यावर जनतेला आरक्षणाचे महत्त्व जास्त चांगल्या प्रकारे समजेल.

पण मुंबईकर महिला आहे ती, तिला भाजपच्या इव्हेंट बाजी दिसली आणि तिथेच तिने सुनावले! महिला आरक्षणाच्या नावाखाली धुंदीत असलेल्या नेत्यांना वास्तवाचा चटका दिला तो एका महिलेने. महिलांच्या प्रगतीचा रस्ता विरोधकांनी अडवला म्हणून बोंबाबोंब करणाऱ्यांना जनतेचे रस्ते अडवून धरल्यावर, सामान्य महिलेने त्यांना 'रस्ता' दाखवला यातच सगळं आलं! भाजपचे आंदोलन म्हणजे फक्त दिखावा होता. पण महिला आघाडी विरुद्ध एकटी महिला असा सामना झाला तेव्हा निकाल वास्तवाच्या बाजूनेच लागला!

## सुनेत्रा पवारांना विजयी करण्याचे शरद पवार यांचे आवाहन

**मुंबई : (स. गांवकरी)**

बारामती विधानसभेच्या पोट निवडणुकीच्या निमित्ताने एक ऐतिहासिक आणि भावूक घडामोड समोर आली आहे. १९६७ मध्ये लढवलेल्या पहिल्या निवडणुकीपासून आतापर्यंत कधीही आपला मतदानाचा हक्क न चुकवणाऱ्या शरद पवार यांना यंदा प्रकृती अस्वास्थ्यामुळे मतदानापासून दूर राहावे लागणार आहे. ही माहिती स्वतः शरद पवार यांनी सोशल मीडियाद्वारे दिली असून, त्यांनी बारामतीकरांना सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करून स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्याचे आवाहन केले आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती विधानसभेच जागा रिक्त झाली होती. या जागेवर पोटनिवडणूक होत असून, सुनेत्रा पवार महायुतीकडून निवडणूक लढवत आहेत. बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे बारामतीत आज सुनेत्रा पवारांसाठी भव्य सांगता सभा पार पडली. या सभेला महायुतीतील तिन्ही पक्षांतील प्रमुख नेत्यांसह शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही हजेरी लावली होती. शरद पवार मात्र प्रकृती ठीक नसल्याने ते



प्रचार सभेला येऊ शकले नाही. त्यातच आता आपण पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार नसल्याचे त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून सांगितले. शरद पवार म्हणाले, मी १९६७ मध्ये लढविलेल्या पहिल्या निवडणुकीपासून बारामती मतदारसंघातील माझ्या मतदानाचा हक्क अखंडपणे बजावला. आता २०२६ मध्ये बारामती विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्राचे एक लाडके व लोकप्रिय नेते स्व. अजित पवार यांच्या दुर्दैवी, अपघाती निधनाच्या शोकात्म पार्श्वभूमीवर ही पोटनिवडणुक होत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## अवैध वाळू उत्खननाविरोधात पथकाची पहाटे मोठी कारवाई

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : दि २० एप्रिल रोजी सोमवारी पहाटे अवैध वाळू उत्खनन प्रकरणात महसूल प्रशासनाच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली. या कारवाई दरम्यान नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करणारे तीन इंजिन व एक बोट जिलेटिनच्या साहाय्याने स्फोट करून उद्ध्वस्त करण्यात आले. जप्त व नष्ट करण्यात आलेल्या साहित्याची अंदाजे किंमत सुमारे १३ लाख रुपये असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. ही कारवाई जिल्हाधिकारी डॉ राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तहसीलदार संजय वारकड यांच्या नेतृत्वात मौजे भनगी येथे करण्यात आली. अवैध वाळू उपशामुळे नदीपात्राचे होणारे नुकसान, पर्यावरणीय हानी तसेच शासनाच्या महसुलाचे होणारे नुकसान लक्षात घेता प्रशासनाने कठोर भूमिका घेत ही धडक कारवाई केली. या मोहिमेत नायब तहसीलदार स्वप्नील दिगलवार, मंडळ अधिकारी श्रीकृष्ण येलमाटे, कुणाल जगताप, अनिरुद्ध जोंधळे, शिवानंद स्वामी, सय्यद मोसीन तसेच ग्राम महसूल अधिकारी मनोज सारपे, मनोज जाधव, गजानन होळगे, रमेश गिरी, राजेश बरोडा, महेश जोशी, गोपीनाथ कल्याणकर, पोलीस कर्मचारी नागरगोजे आणि महसूल सेवक बालाजी सोनटक्के यांनी सहभाग घेतला. प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, पुढील काळातही अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांविरोधात सातत्याने कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा महसूल विभागाने दिला आहे.

## ११ आदिवासी दुर्गम भागातील ग्रामपंचायत गावांना पाणी टँकर सुरू

शिवनेरी (स. गांवकरी) : ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद पुणे, उपविभागीय अधिकारी जुन्नर / आंबेगाव , तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालय जुन्नर यांनी जल जीवन मिशन योजना प्रगतीत जिल्हा परिषद पुणे विभागातून जुन्नर तालुक्यातील ११ आदिवासी दुर्गम भागातील ग्रामपंचायत गावांना पाणी पुरवठा नियोजन करण्यात आले आहे. आदिवासी दुर्गम भागातील शिंदेवाडी , आणे , मांडवे , कोपरे , सुकाळवेढे , हडसर , निमगिरी , गोद्रे , आजनावळे , नळावणे , हडसर या ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण , वाड्या , वस्त्या व परिसरातील एकूण १५ ,३६१ नागरिकांना ११ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे . यासाठी १० विहिरी व १ बोरवेल मधून नागरिकांना पिण्यासाठी पाणी देण्यात येत आहे . पाण्याचे टँकर २०,०००/ - , १२,०००/- , व १०,०००/- लिटर क्षमतेचे आहेत यामुळे सर्व टंचाईग्रस्त आदिवासी भागातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा सुरू आहे.

## आ. दातेंच्या नेतृत्वावर विश्वास; कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

पारनेर (स. गांवकरी) : सोमवार दि. २० एप्रिल २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विकासाभिमुख कार्यशैलीवर आणि सर्वसामान्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यावर विश्वास ठेवत कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे ओढा सातत्याने वाढत असल्याचे चित्र अळकुटी येथे पुन्हा एकदा नव्याने पाहायला मिळाले. अळकुटी येथील परंडवाल मळ्यातील कार्यकर्त्यांनी आज आमदार दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पारनेर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे प्रमुख उपस्थिती होते, पारनेर राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा रेश्मा गलांडे व मच्छिंद्र गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरेश काशिनाथ परंडवाल, सचिन कोडीभाऊ परंडवाल, तुकाराम सिताराम परंडवाल, जयराम शिवराम परंडवाल, प्रविण काशिनाथ परंडवाल, सुयश सुरेश परंडवाल यांनी पक्षाचा झेंडा हाती घेतला. या सर्वांनी आमदार दाते सरांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत विकासाच्या वाटचालीत सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला.

## झगडेवाडी येथे पाच दिवसीय इंटिग्रेटेड योग शिबिर उत्साहात

इंदापूर : (स. गांवकरी) : मौजे झगडेवाडी (ता.इंदापूर जि. पुणे ) येथे पाच दिवसीय इंटिग्रेटेड योग शिबिर उत्साहात संपन्न. मार्च 2026 मध्ये इंदापूर येथे संपन्न झालेल्या योग शिबिराच्या दरम्यान पतंजली योगपीठ हरिद्वार चे केंद्रीय प्रभारी पू .स्वामी परमार्थदेव यांनी इंदापूर तालुक्यामध्ये प्रत्येक गावात योग शिबिराचे आयोजन करणे बाबत सूचना केल्या होत्या त्या अनुषंगाने दि . 15 एप्रिल 2026 ते दि . 19एप्रिल 2026 मध्ये पाच दिवसीय शिबिर मौजे झगडेवाडी येथे गावचे आदर्श सरपंच अतुल झगडे व मा .सरपंच रूपाली अतुल झगडे व उपसरपंच डॉ. दादाराव झगडे ,नामदेव झगडे, उपसरपंच सचिन अभंग, नवनाथ अभंग, प्रल्हाद अभंग, गेमदेव अभंग, मोहन झगडे, लक्ष्मण झगडे, अरुण झगडे, व ग्रामस्थ व महिला भगिनी इत्यादींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवा सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने व पतंजलीचे तहसील प्रभारी दत्तात्रय अनपट व योगशिक्षक शहाजी बोराटे , भाऊसाहेब शिंदे, संजय मोरे, भारत बोंगाणे डॉ .नंदकुमार यादव, लहू गाढवे , अंकुश डुके, सुधीर मखरे ,राजाभाऊ सोनमाळी दशरथ मोरे ,विलास गाढवे,राजश्री शिंदे,सौ. नीता नलवडे,सौ . इंदुमती बोराटे, सौ .प्रतिभा गुजराथी,सौ . आरती गुजराथी , सौ .हेमलता बोंद्रे , अश्विनी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच दिवसीय इंटिग्रेटेड योग शिबिर उत्साहात व बहुसंख्य साधकांच्या उपस्थितीत संपन्न झाले या शिबिरात ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले त्यांनी अशी ग्वाही दिली की आम्ही हा योग वर्ग निरंतर व निशुल्क सातत्याने चालू ठेऊ अशी ग्वाही दिली.

## अवैध प्रवासी वाहतुकीवर पडघा पोलिसांचा अंकुश; कारवाईचे सत्र सुरू

भिवंडी : (स. गांवकरी) : कल्याण–मुरबाड मार्गावरील रायते येथे झालेल्या भीषण अपघातात ११ जणांचा मृत्यू झाल्यानंतर अवैध प्रवासी वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या दुर्घटनेची आठवण अजूनही नागरिकांच्या मनातून पुसली गेलेली नसताना, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पडघा पोलिसांनी कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पडघा परिसरात काळी-पिवळी जीप, व्हॅन तसेच रिक्षांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी कोंबून वाहतूक केली जात असल्याच्या तक्रारी वाढत होत्या. भाड्याच्या हव्यासापोटी चालक प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत असल्याचे चित्र दिसून येत होते. या पार्श्वभूमीवर पडघा ते भिवंडी आणि पडघा ते कल्याण या मार्गांवरील अवैध प्रवासी वाहतुकीवर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पडघा परिसरात वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाहनांची वाढती संख्या यामुळे रस्त्यांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. बाजारपेठा, शैक्षणिक संस्था आणि महामार्गांना जोडणाऱ्या रस्त्यांवर दररोज वाहतूक कोंडी होत असून, नियोजनाच्या अभावामुळे परिस्थिती अधिकच गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर, पडघा स्टेशनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पडघा पोलिस ठाण्याने अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात कारवाईचे सत्र सुरू केले आहे.

# ‘शिवा’ची महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

### शहरातून भव्य मिरवणूक, महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचे मंथन

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)




शिवा’ अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने क्रांतीसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त शहरातून काढलेली भव्य मिरवणूक हे आकर्षणाचे केंद्रबिंदू होते. मिरवणुकीनंतर झालेल्या जाहीर सभेत महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचे मंथन करण्यात आले.

शिवा संघटनेच्या महात्मा बसवेश्वर जयंतीचे हे २५ वे वर्ष होते. त्यानिमित्त संघटनेकडून जय्यत तयारी करण्यात आली होती. जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त सायंकाळी पाच वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यापासून मिरवणुकीला सुरुवात झाली. यावेळी खा. रवींद्र चव्हाण, जयंती समितीचे स्वागताध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजूरकर, जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती संजय बेळगे, भाजप प्रवक्ते संतोष पांडागळे, शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख बबन बारसे यांची यावेळी उपस्थिती होती.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यापासून निघालेल्या या भव्य मिरवणुकीची सांगता जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यासमोर एका जाहीर सभेतून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ‘शिवा’चे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे हे होते. तर उद्घाटक म्हणून राज्यसभा खा. डॉ. अजित गोपछडे, आ. राजेश पवार, माजी आ. अमरनाथ राजूकरकर, महापौर कविता मुळे, माजी सभापती व्यंकट पाटील चांडोळकर, संतोष पांडागळे, नव्यानेच आयएएस अधिकारी झालेले ऋषिकेश पालीमकर, महोत्सव समितीचे अध्यक्ष सोपान मारकवाड, कार्याध्यक्ष अनिल पाटील निमटेककर, ‘शिवा’चे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, राज्य प्रवक्ते विठ्ठलराव ताकबिरे, राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. अनिल माळगे, मराठवाडा अध्यक्ष अर्जुन सैदाने, सरचिटणीस प्रा. किसन ईमडे, हिंगोलीचे जिल्हाध्यक्ष संजय कळने, मराठवाडा अध्यक्ष वीरभद्र बसापुरे, उपाध्यक्ष दिगंबर मांजरमकर, मराठवाडा संघटक डॉ. वैजनाथ हंगरगे, नगरसेवक वैजनाथ देशमुख, मयुर नळदकर आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रा. मनोहर धोंडे म्हणाले की, बस्वकल्याण येथील महात्मा बसवेश्वराच्या मूळ अनुभव मंडप व परसु कट्टा निजामाच्या खासगी मालकीत असून त्याची मुक्तता करणे व महात्मा बसवेश्वरांची शासकीय जयंती देशभर करणे या प्रमुख मागण्यांसाठी लवकरच दिल्ली येथील तालकटोरा स्टेडियमवर शिवा संघटनेच्यावतीने भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. असे सांगतानाच शिवा संघटना ही जनतेच्या कल्याणासाठी सदैव तत्पर असल्याचे सांगितले.

यावेळी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी शिवा संघटनेच्या कार्याचे कौतुक करताना प्रा. मनोहर धोंडे व त्यांच्या टीमने लोकांच्या कल्याणासाठी स्वतःला झोकून दिले असून आपण सुद्धा एक समाजघटक म्हणून खासदार झाल्यापासून वीरशैव लिंगायत समाजाच्या विकासासाठी विविध योजना खेचून आणल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी स्वागताध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांनी आपल्या भाषणातून महात्मा बसवेश्वरांच्या कार्याला उजाळा देताना १२व्या शतकात आंतरजातीय विवाह घडवून आणणाऱ्या महात्मा बसवेश्वरांनी त्याच काळात लोकशाहीचा पाया रचला व त्यात महिलांना आरक्षण दिले. परंतु, आता मात्र, याच आरक्षणासाठी नरेंद्र मोदी सरकार संघर्ष करत आहे. विरोधकांनी कितीही विरोध केला तरी महिलांना आरक्षण देण्यास भाजप कटिबद्ध आहे.

यावेळी आ. राजेश पवार, महपौर सौ. कविताताई मुळे, संतोष पांडागळे, अनिल पाटील निमटेककर ऋषिकेश पालीमकर यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल ताकबिडे यांनी केले. तर सूत्रसंचलन संजय कोठाळे यांनी केले.

# परवाना ५०० चा, उपसा ५००० चा

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

- मॉन्टेकालॉ लि कंपनीवर कारवाई करण्यासाठी मंडळ अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ
- वरिष्ठांकडून चौकशीचे आदेश निघून महिना उलटला तरी मंडळ अधिकारी कारवाई करेना ; समता परिषदेचा आंदोलनाचा इशारा

कंधार तालुक्यातील मौजे लाटी खुर्द येथे गौण खनिजाचा मोठ्या प्रमाणावर अवैध उपसा होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. असून मौजै लाठी खुर्द येथील गट क्रमांक १६७ मध्ये 'मॉन्टकालॉ लि.' या कंपनीने केवळ ५०० ब्रासचा अधिकृत परवाना काढला असताना तब्बल ५००० ब्रास खनिजाचा उपसा केल्याची माहिती दि १५ डिसेंबर ते १९ डिसेंबर २०२५ दरम्यान मंडळ अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देऊन सुद्धा या कंपनी वरती मंडळ अधिकाऱ्याकडून किंवा महसूल विभागा कडून कुठलीही कारवाई झाली नसल्याची गंभीर तक्रार करण्यात आली आहे. याप्रकरणी कंधार तहसील कार्यालयाने चौकशीचे आदेश देऊन महिना उलटला, तरी मंडळ अधिकारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या संगन मतामुळे तेरी भी चूप आणि मेरी भी चुप असा प्रकार होत असून कारवाईला टाळाटाळ करीत असल्याचा आरोप समता परिषदेकडून करण्यात आला आहे.

लाटी खुर्द येथील गट क्रमांक १६७ मध्ये मॉन्टेकालॉ कंपनी कडून गौण खनिज उत्खनन सुरू आहे. नियमानुसार या कंपनीने तहसील कार्यालया कडून ५०० ब्रास उपशाची परवानगी घेतली होती. मात्र, प्रत्यक्षात ५००० ब्रासपेक्षा जास्त अनधिकृत उपसा करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवल्याचा दावा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे नांदेड जिल्हा शहरा उपाध्यक्ष शुद्धोधन ढवळे यांनी तक्रार केली आहे.

# अनिताताई खरात यांचे चौकशीची मागणी करणारे निवेदन

### इंदापूरमध्ये आरटीई प्रवेश प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

इंदापूर : (स. गांवकरी)



इंदापूर तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांच्या नावे आरटीई ऍडमिशन संदर्भात चौकशी करण्याबाबत तेजपृथ्वी ग्रुपच्या अध्यक्षा अनिताताई खरात यांनी आज दि.20 एप्रिल 2026 रोजी निवेदन पत्र दिले आहे.

यामध्ये त्यांनी आरटीई ऍडमिशन मध्ये खूप मोठा घोळ, खरे गोरगरीब गरजवंत यांची मुलं यापासून वंचित राहिले आहेत. इंदापूर तालुकयातील आरटीआय ऍडमिशन साठी अनेक लोकांनी शाळेपासून जिथे घर नाही तेथील पत्रा शेड किंवा काही दुकानाचे लोकेशन टाकून 0.34मीटर 0.37मीटर 0.47 मीटर अंतर दाखवून आरटीई ऍडमिशन फॉर्म भरले आहेत व ते मंजुरी करून घेतले आहेत, शासनाने दाखवून द्यावेत शाळेपासून 0.34 मीटरवर किंवा 0.50 मीटरवर कुठे राहती घर आहेत तशी चौकशी करावी. तसेच तेथील आसपासच्या लोकांकडून ज्यांच्या दोन पत्र्याच्या रूम आहेत अशा काही महाभागाने पाच पाच सहा सहा भाडे करार काही पैसे घेऊन लोकांना करून दिले आहेत. तसेच अनेक भाडेकरार हे फॉर्म सुटल्यानंतर च्या तारखेचे आहेत असेही निदर्शनास आले आहे या सर्व गोष्टीची दोन दिवसात चौकशी होऊन यावरती ठोस निर्णय घ्यावा.गेल्या वर्षीही अनेक अडमिशन चुकीच्या पद्धतीने झाली त्यावेळी आम्ही पंचायत समितीकडे पाठपुरावा केला होता आणि आता पुन्हा तेच घडत आहे यावेळी आम्ही गप बसणार नाही हेही अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवावे, आरटीई ऍडमिशन ही गोरगरिबांसाठी आहेत का श्रीमंत लोकांसाठी आहेत हेच कळंना झाले आहे, पाठीमागील दोन-तीन वर्षापासून चे आरटीआय ऍडमिशन चौकशी केली तरी इंदापूर पासून 25 ते 30 किलोमीटरवर राहणाऱ्या लोकांची मुलही आरटीआय मार्फत शिकतात ती मुलं बसणे येतात मग एक किलोमीटर दीड किलोमीटरचा निर्णय नियम त्यांना कसा लागू होतो याचीही चौकशी करावी आम्हाला कुठल्याही मुलांच्या शिक्षणावर गदा आणायचे नाही परंतु आरटीआयचा उद्देश गरिबांची मुलं शिकणे आहे परंतु इथे तर धनदांडगे राजकारणी आपल्या ओळखीच्या किंवा पैशाच्या जोरावर शाळेच्या शेजारीपाजाऱ्यांकडून भाडेपट्टा करार बोगस करून घेतात व आपल्या मुलांना ऍडमिशन घेतात मात्र गोरगरिबांचे ओळख नसल्याकारणाने किंवा पैशाअभावी त्यांची मुलं या ऍडमिशन पासून वंचित राहत आहेत याचा शासनाने विचार करून आरटीआय मध्ये काहीतरी ठोस निर्णय घ्यावेत ही शासनाला विनंती अशा असयाचे निवेदन पत्र सुनील मोघल अधिकारी यांना दिले आहे.

# ठाणे महानगरपालिकेतील नगरसेवकांना ओळखचिन्हाचे वाटप

ठाणे : (स. गांवकरी)




ठाणे महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवकांना आज झालेल्या मा. सर्वसाधारण सभेत महापालिकेचे बोधचिन्ह असलेल्या ‘नगरसेवक ओळख’ चिन्हाचे वाटप महापौर शर्मिला पिंपळोलकर महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले. महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे नगरसेवकांची गेल्या अनेक वर्षापासून असलेली मागणी पूर्ण झाली आहे.

महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषद सदस्य असलेले बोधचिन्ह वाटप करण्यात येते त्याप्रमाणे ठाणे महापालिका सदस्यांना ओळखपत्रासोबत नगरसेवक असे दर्शविणारे ओळख चिन्ह द्यावे अशी मागणी शिवसना गटनेते पवन कदम यांनी पत्रान्वये महापौरांकडे केली होती.

महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी याबाबत ठाणे महापालिकेतील सर्व सदस्यांना महापालिकेचे बोधचिन्ह असलेले ओळख चिन्ह देण्याबाबत आयुक्त सौरभ राव यांना पत्र दिले होते. त्यानुसार आयुक्त सौरभ राव यांनी तातडीने दखल घेत महापालिकेतील नगरसेवकांना बोधचिन्ह देण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले होते. त्यानुसार आज सोमवार दिनांक 20/04/2026 रोजी झालेल्या मा. सर्वसाधारण सभेत या ओळख चिन्हाचे वाटप सर्व नगरसेवकांना महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, सर्वपक्षीय गटनेते उपस्थित होते. गेले साडेतीन वर्षे महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय राजवट होती. जानेवारी 2026 मध्ये झालेल्या निवडणुकीत ठाणे महानगरपालिकेत नवीन नगरसेवकांची संख्या जास्त आहे. नगरसेवक हे कामानिमित्त सतत महानगरपालिकेच्या मुख्यालयात तसेच प्रभाग समिती कार्यालयात जात असतात. शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये कामकाजाच्या निमित्ताने ये-जा करताना सदस्यांची ओळख सुलभ व्हावी तसेच प्रशासकीय समन्वय अधिक प्रभावी होण्यासाठी महापालिकेचे बोधचिन्ह असलेले नगरसेवक ओळखचिन्ह उपयुक्त ठरणार असल्याचे शिवसेना गटनेते पवन कदम यांनी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांना देण्यात आलेल्या पत्रात नमूद केले होते. दरम्यान नगरसेवक भरत चव्हाण यांनी देखील प्रस्तावाची सूचना महापौरांना दिली होती. आज मा. सर्वसाधारण सभेत सर्व नगरसेवकांना ओळख चिन्हाचे वाटप केल्याबद्दल सर्व पक्षीय नगरसेवकांनी महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांचे आभार मानले.

# ठाण्यात मॅकडोनाल्ड जवळ फॅशन स्टोअर जळून खाक

ठाणे : (स. गांवकरी)



दिनांक २०/०४/२०२६ रोजी पहाटे ५:४० वाजताच्या सुमारास ठाणे स्टेशन पॅराडाईज सोसायटी, मॅकडोनाल्ड जवळ, गावदेवी मंदिर जवळ, गोखले रोड, नौपाडा, ठाणे. (प.) या ठिकाणी पॅराडाईज सोसायटीच्या ( इमारत तळ + ९ मजली) तळमजल्यावरील असलेल्या प्राची फॅशन स्टोअर (तळ+१, मालक: श्री. चेतन बोरीचा, अंदाजे २५०० स्क्वेअर फुट) या दुकानामध्ये आग लागली होती. घटनास्थळी नगरसेवक संजय वाघुले सो., आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री. वाय. एम. तडवी सो., मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. गिरीश झळके सो., नौपाडा पोलीस कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान ०३- फायर वाहनासह २ वॉटर टँकर, ०१- रेस्क्यू वाहनासह, व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१- पिकअप वाहनासह, ०१- जेसीबी मशीनसह, महावितरण कर्मचारी,०१- ठा.म.पा. रुग्णवाहिका, ठा.म.पा. अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही. सदर घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांकडून व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांच्या मदतीने लागलेली आग ०८:४० वाजताच्या सुमारास पूर्णपणे विझविण्यात आली आहे. परिस्थिती नियंत्रणात असून आगीमध्ये संपूर्ण दुकानाचे जळून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये उन्हाळी शिबिराचे उद्घाटन

### उन्हाळी शिबिर विद्यार्थ्यांसाठी खेळ, ज्ञान व मनोरंजनाची मेजवानी-जगदिश झालानी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त मनोरंजन आणि खेळातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक,शारीरिक व मानसिक विकास व्हावा.यासाठी हस्तकला,चित्रकला,विविध खेळ,योगा, इको फ्रेंडली ज्वेलरी बनवणे, फॅशन शो,अबॅकस यांचे प्रशिक्षण देण्यात येते. विद्यार्थ्यांच्या कला गुणांचा विकसित होतो. मेहेर इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून सर्वच मुलांना शिबिरात सहभागी होण्याची संधी दिली आहे.उन्हाळी शिबिर विद्यार्थ्यांसाठी खेळ, ज्ञान व मनोरंजनाची मेजवानीच आहे. शअसे प्रतिपादन मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदिश झालानी यांनी केले आहे. हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये दि. 20 एप्रिल ते 29 एप्रिल 2026 या कालावधीत तीन वर्ष ते तेरा वर्षे वयोगटातील मुलांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.याप्रसंगी हिंदसेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,सारडा महाविद्यालयाच्या जुनियर कॉलेजचे चेअरमन डॉ.पारस कोठारी,भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन प्रा.ज्योती कुलकर्णी, मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी, विश्व मंगल आयुर्वेद चे संचालक डॉ.स्नेहलकुमार राहणे,प्राचार्य सुनील सुसरे,मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे आदी उपस्थित होते.

सुमतीलाल कोठारी म्हणाले,मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. शाळेचे चेअरमन जगदीश झालानी व प्राचार्य अनुरीता झगडे यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे शाळेची प्रगती झपाट्याने होत आहे.नवीन वर्षात शाळेच्या नूतन इमारतीचे बांधकाम लवकरच सुरू होईल.असे त्यांनी यावेळी सांगितले. अजित बोरा यांनी उन्हाळी शिबिरासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन या शिबिरातून विद्यार्थ्यांनी कलागुण जोपासावेत असे सांगितले. डॉ.पारस कोठारी म्हणाले, या शिबिरासाठी विद्यार्थ्यांकडून नाममात्र शुल्क आकारण्यात आले आहे.विद्यार्थ्यांनी सकस आहर घ्यावा.उन्हाळी शिबिर ही काळाची गरज आहे. अभ्यासात गुंतून न राहता हसत खेळत शिक्षण घ्यावे.प्रा.ज्योती कुलकर्णी म्हणाले,मुलांनी फास्ट फूड,चायनीज, बर्गर, पिझ्झा,मॅगी या गोष्टींचे सेवन करू नये.तर मुलांनी पोळी भाजी,फळे यांचा आहार घ्यावा. उन्हाळी शिबिरामध्ये मनमुक्तपणे खेळण्याचा आनंद घ्यावा. डॉ.स्नेहलकुमार राहणे यांनी फिटनेस की पाठशाळा अंतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले जाणार आहे.असे सांगितले. प्रास्तविकात प्रा.अनुरीता झगडे म्हणाले,उन्हाळी शिबिरातून विद्यार्थ्यांनी विविध खेळ आत्मसात करावे. नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी तसेच आहाराविषयी डॉक्टरांचा सल्ला देण्यात येणार आहे.

या शिबिरामध्ये रेन डान्स,अबॅकस, विविध खेळांमधून प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन देविका छजलानी यांनी केले.

# थोडक्यात पण महत्वाचे

## जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदासाठी माधव कदम यांच्या ठराव



मुदखेड (स. गांवकरी) : नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदासाठी माजी उपनगराध्यक्ष माधव कदम यांच्या नावाने मुदखेड सेवा सहकारी सोसायटीचा ठराव घेण्यात आला आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत चांगलीची चढावड निर्माण झाली असुन खासदार अशोकराव चव्हाण व आमदार श्रीजया चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मुदखेड तालुक्यातील जवळ पास सेवा सहकारी सोसायटी चे ठराव घेण्यात आले. मुदखेड सेवा सहकारी सोसायटी च्या झालेल्या बैठकीत सोसायटी चे चेअरमन गणपत कदम यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदासाठी माधव रामराव कदम यांच्या ठराव घेण्यात आला. यावेळी चेअरमन गणपत कदम, व्हाइस चेअरमन मैनोदीन फरिदसाब मच्छीवाले, सचिव गंगाधर वैजे, संचालक बालाजी पांडुरंग देवडे, मोहम्मद युसुफ मौलाना, सदानंद भगवान चौधरी, बालाजी संभाजी काळे, वैजनाथ तोलाजी भालेराव, अभय दत्तराम लोखंडे, दत्ता मुंजाजी बोडके, शोभाबाई व्यकटी मोडवान यांनी ठराव मंजूर करण्यात आला आहे. या बैठकीचं कामकाज सहकार क्षेत्रातील सेक्युरिटी गंगाधर वैजे यांनी काम पाहिले. माधव कदम यांच्या निवडीबद्दल तालुका अध्यक्ष दत्तू देशमुख, शहराध्यक्ष रामसिंग, माजी नगराध्यक्ष नारायण कोत्तावार, माजी नगराध्यक्ष सुनील शेट्टे, माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे, उपनगराध्यक्ष इमरान मच्छीवाले,माधव बोंडले, भीमराव पाटील पारवेकर, बालाजी ढगे, शंकर राठी, किशोर पारेवेकर, गोविंद कल्याणकर, ईश्वर पिन्नलवार, दिनेश शेटे यांनी शुभेच्छा दिल्या.

## अध्यक्षपदी पत्रकार आनंद मोरे तर उपाध्यक्षपदी बंटी मोरे यांची निवड



अर्धापूर (स. गांवकरी) : अर्धापूर तालुक्यातील मौजे बारसगांव येथे महामानव, विश्वरत्न प्रज्ञासूर्य क्रांतीसुर्य भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व परमपूज्य भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त सार्वजनिक उत्सव साजरा करण्यासाठी नुकतीच एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत नवीन कार्यकारिणी ची निवड करण्यात आली असून जयंती मंडळ अध्यक्षपदी आनंद मोरे ,उपाध्यक्षपदी बंटी मोरे अर्धापूर वंचित बहुजन आघाडी चे ता अध्यक्ष विनय उर्फ बंटी हिरामण मोरे व कोषाध्यक्ष तानाजी वाघमारे सचिव अॅड राजरत्न सितळे सहसचिव देवा वाघमारे संघटक माधव मोरे सदस्य भिमराव मोरे शामराव वाघमारे हिरामण मोरे खंडोजी वाघमारे गोतम सितळे सुनिल शामराव मोरे ग्यानोजी ताटे नामदेव ताटे कामाजी मोरे कोंडीबा मोरे काशीनाथ मोरे शंकर ताटे नागेश सितळे दगडू मोरे रुकेक्ष वाघमारे बबलु ताटे बाबासाहेब एडके संघर्ष सुरज धुताडे सुरेश ताटे गंगाप्रसाद वाघमारे श्रीरंग वाघमारे पुरभाजी ताटे राजु ताटे मिलिंद ताटे पुरभाजी वाघमारे प्रभु ताटे नवनाथ ताटे जयपाल मोरे तथागत मोरे अजय मोरे विजय मोरे प्रकाश धुताडे माधव जमदाडे बापुराव कोलते भय्या ताटे शामराव कांबळे,अक्षय वाघमारे आकाश पिराजी ताटे मोरे महेंद्र ताटे सोपनिल मोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विश्वरत्न प्रज्ञासूर्य क्रांतीसुर्य भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व परमपूज्य भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ पर्यंत विविध गायन पार्टी मोठ्या प्रमाणात प्रबोधनकार पदाधिकारी सहभागी होणार आहेत कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित रहावे उपक्रमांनी भीम जयंती सोहळा विविध व्यसनमुक्ती व सामाजिक सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करून साजरा करण्यात येणार असून दि २८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

## लोहगाव येथे 'महाराजस्व समाधान शिबिर' उत्साहात संपन्न



बिलोली (स. गांवकरी) : महसूल सेवा आपल्या दारी, लोकाभिमुख प्रशासनाची भरारी" हे ब्रीदवाक्य घेऊन बिलोली तहसील कार्यालय व मंडळ अधिकारी कार्यालय, लोहगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. १७) लोहगाव येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अत्यंत उत्साहात पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून परिसरातील शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिकांच्या महसूल विषयक समस्यांचे जागीच निराकरण करण्यात आले.स्थानिक जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात आयोजित या शिबिराचा मुख्य उद्देश प्रशासकीय सेवा अधिक गतिमान आणि पारदर्शक करणे हा होता. यावेळी विभागीय अधिकारी क्रांती डोंबे तहसीलदार गजानन शिंदे लोहगाव मंडळ अधिकारी लक्ष्मीकांत आंबेराव यांच्यासह सर्व ग्राम महसूल अधिकारी व संबंधित विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. शिबिरामध्ये १५ हून अधिक प्रमुख सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने नागरिकांना डिजिटल स्वाक्षरीत सातबारा व खाते उताऱ्यांचे वाटप करण्यात आले तुकडेबंदी कायद्यांतर्गत दि. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ नोव्हेंबर २०२४ पर्यंतचे प्रलंबित खरेदी-विक्री व्यवहार नियमानुकूल करण्याबाबत मार्गदर्शन व अर्ज स्वीकारण्यात आले आगामी शैक्षणिक वर्ष लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या विविध दाखल्यांसाठी विशेष कक्ष उभारण्यात आला होता. पी.एम. किसान सन्मान निधी योजनेतील त्रुटी दुरुस्ती आणि नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. शिबिरादरम्यान 'जिवंत ७/१२ मोहीम' अंतर्गत सातबारा वाचन करण्यात आले, ज्यामुळे अनेक तांत्रिक चुका जागीच दुरुस्त करण्यास मदत झाली. भोगवटदार वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ मध्ये परावर्तित करण्याबाबतही शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. महसूल विभागासोबतच कृषी, ग्रामविकास, आरोग्य आणि भूमी अभिलेख विभागाच्या प्रतिनिधींनीही उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण केले.


### Change the Name

I, LAXMAN VITTHAL DHINDALE, residing at At -Post Rajur, Tal. Akole, Dist. Ahilyanagar, Maharashtra 422604, hereby declare that the names LAXMAN VITTHAL DHINDALE and LAXMAN VITHOBA DHINDALE refer to one and the same person, i.e., myself.

The variation has occurred due to the use of my father's name as VITTHAL in some records and VITHOBA in others. Both names refer to my same father.

For all official purposes, including passport documentation, my correct and preferred name **is LAXMAN VITTHAL DHINDALE**

Date: 16/04/2026

Place: Rajur, Ahilyanagar


# गोशाळा, शाळा व मंदिर उभारणीचा संकल्प!

**भोपाळ येथे अखिल भारतीय गुजरात समाजाकडून शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांचे भव्य स्वागत**





भोपाळ (मध्य प्रदेश) : (स. गांवकरी)

अखिल भारतीय गुजरात समाजाच्या वतीने भोपाळ येथे आयोजित कार्यक्रमात थोर समाजसेवक शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी समाजाच्या वतीने गोशाळा, शाळा व मंदिर उभारण्याचा महत्त्वपूर्ण संकल्प करण्यात आला.

याप्रसंगी अयोध्या येथील राम जानकी मंदिराचे पिठाधीश्वर जगनजेय महाराज यांनी 'राम-जानकी' या विषयावर मार्गदर्शन करताना समाजातील एकीमुळेच सर्वांगीण विकास साध्य होतो, असे प्रतिपादन केले. त्यांनी समाजाने एकत्रित राहून धार्मिक व सामाजिक कार्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमात बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी गुजरात समाजाच्या कार्याचा गौरव करत सांगितले की, हा समाज नेहमीच देण्याच्या भावनेने कार्यरत राहिला आहे. शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शिक्षण संस्थांमध्ये लाखो विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यांच्या सामाजिक कार्याची छाप संपूर्ण देशभर उमटली आहे. सुख-दुःखाच्या प्रसंगी समाजाने एकत्र राहणे हीच खरी ताकद असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. स्वतःच्या मनोगतात शेठ नानजीभाई ठक्कर यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, जीवनात शिक्षण अत्यंत गरजेचे असून व्यसनापासून दूर राहणे आवश्यक आहे. या जगात आई-वडील सर्वात मोठे असून प्रत्येकाने शिक्षण घेऊन समाजाच्या प्रगतीस हातभार लावावा, असे त्यांनी आवाहन केले.

यावेळी अखिल भारतीय गुजरात समाजाच्या वतीने जगनजेय महाराज व शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांना स्मृतिचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास मनोजभाई जहा, चेतनभाई पटेल, निलेश शहा, रेणुका मेहता, रेखा काटावाला, अॅड. तेजस्विनी पटेल, अॅड. अरुणभाई चौधरी, शांतीभाई परीघ, सुनील संगोलिया आदी मान्यवर उपस्थित होते. अखिल भारतीय गुजरात समाजाचे अध्यक्ष संजयभाई पटेल यांनीही आपल्या मनोगतात सांगितले की, देश-राज्यात नोकरीनिमित्त विखुरलेले असले तरी हा समाज नेहमीच सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी पुढाकार घेत असतो. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. या उपक्रमातून समाजातील ऐक्य, सेवा व विकासाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

## विद्यार्थिनींची रांगोळी व निबंध स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

मुदखेड : (स. गांवकरी)



राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील विद्यार्थिनींनी राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेला उंची दिली आहे.

सारनाथ बोध विहार, दीपक नगर, तरोडा, नांदेड येथे भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील बी.एस्सी. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी कु. अंजली संतोष सोनटक्के हिने प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेतील प्रथम पारितोषिक म्हणून रुपये ११,१११/- रोख रक्कम व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. नांदेड महानगरपालिकेच्या महापौर सौ. कविताताई मुळे यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. तसेच, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने आयोजित महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवानिमित्त रांगोळी स्पर्धेतही कु. अंजली सोनटक्के हिने प्रथम क्रमांक मिळवून दुहेरी यश संपादन केले. या दोन्ही स्पर्धांमधील तिच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दरम्यान, शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेमध्ये महाविद्यालयातीलच बी.एस्सी. द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी कु. सलोनी साहेबराव जोंधळे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. बक्षिसाचे स्वरूप रोख रक्कम १,०००/ रुपये व सन्मानचिन्ह आहे.

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपघात; कार थेट कालव्यात

(स. गांवकरी)



घटना दि १९ एप्रिल रोजी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास घडली. कौठा–गडगा मार्गावरील मानार प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील अरुंद पुलावरून एक कार थेट कालव्यात कोसळली. या अपघातात कारमधील पाच जण गंभीर जखमी झाले असून परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गडगा येथून कौठ्याकडे येणारी एमएच २६ सीपी ०२०९ क्रमांकाची कार एका कार्यक्रमावरून परतत होती. पुलाजवळ पोहोचताच चालकाचा ताबा सुटला आणि कार थेट कालव्यात कोसळली. पुल अत्यंत अरुंद असल्यामुळे वाहनाला संतुलन राखता आले नाही, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. कारमध्ये दोन महिला, दोन पुरुष आणि एक लहान बालक प्रवास करत होते. अपघातग्रस्त हे राऊतखेडा येथील सेवानिवृत्त सैनिक व त्याचे कुटुंब असल्याचे सांगण्यात आले.

अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेत मदतकार्य सुरू केले. काही नागरिकांनी कालव्यात उतरून जखमींना बाहेर काढले. त्यानंतर सर्वांना तातडीने जवळील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार प्राथमिक उपचार करून नादेड येथे पाठवण्यात आले

सुदैवाने कालव्यात पाणी नसल्यामुळे मदतकार्य करताना कोणताही अडथळा निर्माण झाला नाही. दरम्यान, या पुलावर यापूर्वीही अनेक अपघात झाले असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. रस्ता तुलनेने रुंद असताना पुल मात्र अरुंद असल्याने वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण होत आहे. तरीही सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

'मृत्यूचा सापळा' ठरत असलेल्या या पुलाचे तात्काळ रुंदीकरण करावे, तसेच मजबूत रेलिंग, इशारा फलक आणि प्रकाशयोजना यांसारख्या सुरक्षात्मक उपाययोजना त्वरित कराव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने आज अहिल्यानगर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन माननीय श्री. संग्राम जगताप (महाराष्ट्र विधानसभेचे आमदार) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अहिल्यानगर परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश आहे.

उद्घाटनाच्या निमित्ताने, ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल. अपॉइंटमेंट साठी कृपया ८९२५५ १०८०७ या मोबाईल क्रमांकावर सम्पर्क संपर्क असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. ६,७३५ चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (लेसिक), कॉर्निया, काचबिंदू, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार, परिणाम सुनिश्चित केले जातील.

याप्रसंगी बोलताना आमदार श्री. संग्राम जगताप म्हणाले, "अहिल्यानगर सारख्या वेगाने विकसित होणाऱ्या भागांमध्ये सुलभ आणि विशेषीकृत आरोग्यसेवेची गरज वाढत आहे. डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने प्रगत नेत्रसेवा लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केल्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. यामुळे दृष्टीसंबंधित समस्यांचे लवकर निदान, प्रतिबंध आणि उपचार करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली जाईल."

डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) यांनी सांगितले, "डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलमध्ये आमचा मुख्य भर प्रगत नेत्रसेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यावर आणि उच्च दर्जाची वैद्यकीय गुणवत्ता राखण्यावर आहे. अहिल्यानगर केंद्र हे या वेगाने विकसित होणाऱ्या भागातील रुग्णांपर्यंत विशेष सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे." श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) म्हणाले,"आम्ही रुग्णकेंद्रित सुविधा उभारण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, ज्या मजबूत क्लिनिकल प्रणाली आणि उत्कृष्ट व्यवस्थापनावर आधारित आहेत.

## नाशिकमध्ये राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा उत्साहात

नाशिक : (स. गांवकरी)



आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित "राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा २०२६" हा भव्य आणि प्रेरणादायी कार्यक्रम नाशिक येथे अत्यंत उत्साहात व दिमाखात पार पडला. महिला उद्योजक आणि युवा उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या सोहळ्याने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री स्वरा राजपूत यांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली. त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली आणि नवउद्योजकांना नवे ध्येय मिळाले. संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे मुख्य संयोजक गणेश रामदास विटकर यांच्या कुशल नेतृत्वाखाली हा सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाला. कार्यक्रमात गोदा इंटरटेनमेंटचे दिलीप जाधव, सुप्रसिद्ध निवेदक गणेश मोढवे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उद्योजक, कृषी तज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना "राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६" प्रदान करण्यात आला. गायन क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल गायत्री अमोघ कुलकर्णी यांना "सुरेल आवाजाची सृजनहार" या विशेष गौरवासह राष्ट्रीय गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## ब्राह्मण महिलांच्या पुढाकारातून नायगावात परशुराम-बसवेश्वर जयंती साजरी

*"भगवान परशुराम व महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा आदर्श हाच समाजहिताचा खरा मार्ग" — कीर्तनकार ताराबाई बोमनाळे*

नायगाव : (स. गांवकरी)



नायगाव शहरात प्रथमच महिलांच्या पुढाकारातून भगवान परशुराम व महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी समाजातील एकल कष्टकरी महिलांचा सन्मान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम राबविण्यात आला.

कीर्तनकार ताराबाई बोमनाळे यांनी आपल्या प्रवचनात भगवान परशुराम यांनी दुष्ट संहारासाठी घेतलेला अवतार आणि महात्मा बसवेश्वर यांनी समाजातील वाईट चालीरीती नष्ट करण्यासाठी केलेले कार्य याचा उल्लेख करत, या महान व्यक्तिमत्त्वांचा आदर्श समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. अशा आदर्शांचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रविवार, १९ एप्रिल रोजी गजानन नगर येथील 'नृसिंह निवास' येथे हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सुनीता प्रदीप कुलकर्णी (सुजलेगावकर) होत्या. प्रमुख अतिथी म्हणून यमुनाबाई प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनंदा बाळासाहेब पांडे, अध्यापिका उज्वलाबाई बालाजी नागठाणे, नरसी येथील रोहिणी संदीप गुरू नरसीकर तसेच सौ. आम्लापुरे ताई उपस्थित होत्या.

नायगाव ब्राह्मण महासंघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही समाजातील वंचित घटकांना सहभागी करून घेण्याचा उपक्रम राबविण्यात आला. विशेष उपक्रम म्हणून पतीच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणाऱ्या एकल कष्टकरी महिलांचा शोध घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सर्व श्रीमती अनुराधा साहेबराव गौरवाड, ज्योती दत्ता पवार, महादा माधव इबीतवाड, लता बालाजी हाराळे, भाग्यश्री उद्धव कारले आदींचा समावेश होता.

सन्मानित महिलांना साडी-चोळी, थंड पाण्याची बाटली, पुष्पहार व नववस्त्र देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमातून समाजातील दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याच श्यामल कुलकर्णी यांनी सांगितले.

यापूर्वीही ब्राह्मण महासंघाने एसटी चालक-वाहकांचा सन्मान, पाणपोई उभारणे, परिचारिका व महिला पोलिस कर्मचाऱ्यांचा गौरव, हातगाडी व रिक्षाचालकांचे विमा संरक्षण, झोपडपट्टीतील कुटुंबांना मदत, तसेच चर्मकार बांधवांना छत्र्यांचे वाटप असे विविध समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. हे सर्व उपक्रम जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) बाळासाहेब पांडे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने राबवले जात असून, समाजात एकात्मता व सहकार्याची भावना वाढीस लागावी हा यामागील उद्देश आहे. यंदाच्या जयंतीनिमित्त महिलांनी घेतलेला पुढाकार समाजात सकारात्मक संदेश देणारा ठरेल, असा विश्वास संयोजक श्यामल कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात सुनंदा पांडे, उज्वला नागठाणे, सुनीता कुलकर्णी आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्यामल श्याम कुलकर्णी यांनी केले, तर आभार कीर्ती मंगेश देशपांडे यांनी मानले.

# बावड्यात गुणवंतांचा सत्कार समारंभ संपन्न



इंदापूर : (स. गांवकरी)

बावडा (ता- इंदापूर) येथे किसान सार्वजनिक वाचनालय,शेतकरी संघर्ष समिती,किसान बहुउद्देशिय संस्था व बावडा ग्रामस्थांच्या वतीने रविवार दि.19 एप्रिल रोजी किसान सार्वजनिक वाचनालयाच्या हॉलमध्ये गावातील

सेवानिवृत्त शिक्षक,सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उत्तम काम करून राज्य स्तरावरील सन्मान प्राप्त केलेले एम. पी. एस .सी परीक्षेत यश संपादन करून राज्य शासनातील विविध पदावर निवड झालेल्या गुणवंतांचा शाल पुष्पहार गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.

यामध्ये संभाजी टोंगळे व सुरेश शिंदे(सेवानिवृत्त शिक्षक), मेजर किशोर घोगरे(सेवानिवृत्त सैनिक), प्रख्यात भारूडकार ह.भ.प.लक्ष्मण राजगुरु (दादा कोंडके समाजरत्न पुरस्कार) तात्याबा गायकवाड (समाजभूषण पुरस्कार), ओंकार आसबे (विक्रीकर अधिकारी), बाळासाहेब माने ( धाराशिव जिल्हा गुप्तचर विभाग प्रमुख पदावर बढती), ऋषिकेश घोगरे (नगररचनाकार वर्ग 1) यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मयूरसिंह पाटील हे होते . यावेळी निरा भिमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक उमेश पाटील, ज्ञानदेव बागल , तुकाराम घोगरे , निलेश घोगरे , विजय काटकर , पंडितराव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मयूरसिंह पाटील,लक्ष्मण राजगुरु,सुरेश शिंदे व उमेश पाटील यांनी मनोगत व्यक्त केली. मयूरसिंह पाटील यांनी किसान सार्वजनिक वाचनालयास आकरा हजार रूपये देणगी जाहीर केली. तसेच तात्याबा गायकवाड सिरींज फॅन भेट दिला. कार्यक्रमांच्या प्रास्ताविक व आभार किसान सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष पंडितराव पाटील यांनी केले.



ठाणे : काल डोंबिवली स्थानकाजवळ लोकलचा डब्बा घसारल्याने लाखों प्रवाश्यांना मनस्ताप सहन करावा लागला होता त्यात दुसऱ्या दिवशीही मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली व लोकल सेवा अर्धा तास उशिराने धावत होत्या परिणामी दिवा रेल्वे स्थानकात प्रवाश्यांची प्रचंड गर्दी पहावयास मिळाली. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### संत महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : उदापुर ता:-जुन्नर येथे श्री संत महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त समस्त लिंगायत समाजा च्या वतीने जेष्ठ चित्रकलाशिक्षक रमाकांत वाळेकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. महात्मा बसवेश्वर यांनी मानवता हा एकच धर्म असल्याचे सांगितले. कुठलाही जातीभेद न करता मानव हा जगातील एकमेव श्रेष्ठ धर्म आहे. प्रत्येकाने समाजात वावरतानाआपापसात मान सन्मानाने,प्रेमाने व माणुसकीने वागल्यास निश्चितच देशासह जगभरात शांतता प्रस्थापित होईल असे संतोष होनराव यांनी सांगितले. यावेळेस माजी उपसरपंच रामदास वल्ह्णकर, भानुदास वाळेकर, धनंजय ढमढेरे, संतोष ढमढेरे, अवधूत बेदरे, रेवणनाथ वल्ह्णकर, श्लोक होनराव उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार माजी ग्रामपंचायत सदस्य मोहन वल्ह्णकर यांनी मानले.



### नानजीभाई ठक्कर व डॉ. विश्वासराव आरोटे यांचे भोपाळ एअरपोर्टवर स्वागत

भोपाळ (मध्य प्रदेश) (स. गांवकरी) : आज थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांचे भोपाळ एअरपोर्टवर आगमन होताच त्यांचे उत्साहात व भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी अयोध्या मंदिर येथील पीठाधीश्वर जगनेजय महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या स्वागतासाठी उपस्थितांनी फुलांचे गुच्छ देऊन व सत्कार करून आपला आनंद व्यक्त केला. या स्वागत समारंभामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित मान्यवरांनी या भेटीमुळे सामाजिक, धार्मिक व पत्रकारितेच्या क्षेत्रात नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला.

### आरक्षणाच्या लढ्याला मोठे यश



पुणे (स. गांवकरी) : महाराष्ट्र सरकारच्या प्रस्तावित अनुसूचित जाती (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात सुरू असलेल्या लोकचळवळीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'महाराष्ट्र अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समिती' (पद्मपाणी फाउंडेशन) तसेच विविध पक्ष, संघटना व सामाजिक संस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आतापर्यंत प्रशासनाकडे ३३,००० पेक्षा अधिक हरकती ईमेलद्वारे प्राप्त झाल्या आहेत. ही संख्या समाजातील तीव्र अस्वस्थता आणि वाढती जागृती दर्शवणारी मानली जात आहे. आज पुनर्विलोकन समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बार्टी (BARTI), पुणे येथील निबंधकांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीतून दोन महत्त्वाचे मुद्दे समोर आले. प्रथम, उपवर्गीकरणाविरोधात पाठविण्यात आलेल्या प्रत्येक हरकतीला प्रशासनाकडून अधिकृत पोहच (Acknowledgment) दिली जाईल, असे आश्वासन देण्यात आले. यामुळे प्रत्येक हरकतीची अधिकृत नोंद होणार असून प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दुसरे म्हणजे, न्यायमूर्ती अनंत बदर समितीच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. समितीने अहवाल तयार करताना पारदर्शकता न ठेवता जनभावनांचा पुरेसा विचार केला नाही, तसेच संपूर्ण प्रक्रिया गोपनीय ठेवली, असा आरोप करण्यात आला. त्यामुळे हा अहवाल नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना धरून नसल्याची टीका करण्यात आली.

### प्रा. प्रल्हाद साळुंखे यांना जामखेड भूषण पुरस्कार प्रदान

जामखेड तालुका (स. गांवकरी) : दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. प्रल्हाद साळुंखे यांना शिव-फुले-आंबेडकर संयुक्त जयंती उत्सवात मान्यवरांच्या हस्ते जामखेड भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, मंत्री छगन भुजबळ, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, नगराध्यक्ष प्रांजल चिंतामणी, अमित चिंतामणी आणि महेश निमोणकर यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते प्रा. साळुंखे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. चंदीगड येथे झालेल्या खेलो मास्टर गेम्स राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये प्रा. साळुंखे यांनी गोळाफेक प्रकारात सुवर्णपदक पटकावले होते. या कामगिरीमुळे विद्यालयासह तालुक्याची मान उंचावली होती. याच राष्ट्रीय स्पर्धेतील सुवर्णपदकामुळे त्यांची वर्ल्ड मास्टर गेम्स २०२७, कन्साई (जपान) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याच उत्तुंग कामगिरीची दखल घेत त्यांना जामखेड भूषण पुरस्कार देण्यात आला. या यशाबद्दल बोलताना प्रा. साळुंखे म्हणाले की, पहिल्याच प्रयत्नात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे.

# पेटले नवसाचे ५८ कठे; पेटलेल्या कठ्याचा थरार



राजूर : (स. गांवकरी)

गावातून पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवत आलेल्या बिरोबाच्या काठीचा गाभाऱ्यातील मूर्तीला स्पर्श झाला. घंटानाद झाला अन् नवसाचे कठे पेटवले गेले. कठे पेटताच मोकळ्या जागेत भक्तांचा हाई... हाई.... चा चित्कार आणि यानंतर सुरू झाला कठ्याच्या यात्रेचा थरार. हजारो भाविकांच्या उपस्थितीत कठ्यांतून निघणाऱ्या त्या ज्वाळांनी किर्रर अंधाऱ्या रात्री सभोवतालचा आसमंतही उजाळून निघाला.

राजूरपासून जवळच असलेल्या अकोले तालुक्यातील कौठवाडी येथील बिरोबाच्या यात्रेत रविवारी रात्री हजारो भाविकांच्या उपस्थितीत मानाच्या कठ्याबरोबर तब्बल 58 नवसाचे कठे पेटले. आदिवासी समाज आपली धार्मिकता आणि श्रद्धा जपत गेल्या अनेक वर्षांच्या परंपरेनुसार कौठवाडी येथे अक्षय तृतीयेच्या नंतर येणाऱ्या रविवारी बिरोबाची म्हणजेच कठ्याची यात्रा भरत असते. मागील यात्रा इतिहास पाहता कठ्यांची संख्या आणि उपस्थितांची संख्या यात वाढ होताना दिसून येत आहे. रविवारी रात्री नऊ वाजता यातील पेटवलेला मानाचा कठा उचलला गेला आणि इतर धगधगते कठे हे भक्त डोक्यावर घेत मंदिराभोवती फेऱ्या मारण्यास सुरुवात झाली. आग ओकणाऱ्या प्रत्येक कठ्या मागे नवस फेडणारी एक व्यक्ती त्यात गोडेतेल ओतत होती. धगधगत्या कठ्यात ओतलेले तेल या भक्तांच्या अंगा खांद्यावरून ओघळत होते, पण श्रद्धेपोटी उचललेल्या या काठ्यांतून

ओघळणाऱ्या गरम तेलाची इजा आजपर्यंत कोणालाही झाली नसल्याचे गावकरी सांगतात. सुमारे दोन तास चाललेल्या या कार्यक्रमाने उपस्थित भाविकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. राजूरपासून जवळच असलेल्या अकोले तालुक्यातील कौठवाडी येथील बिरोबाच्या यात्रेत रविवारी रात्री हजारो भाविकांच्या उपस्थितीत नवसाचे कठे पेटले. कौठवाडी व साकीरवाडी ग्रामस्थ यांनी यात्रेचे नियोजन केले. राजूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला. यामुळे ही कठ्याची यात्रा निर्विघ्नपणे संपन्न झाली.

### कठा म्हणजे काय?

कठा म्हणजे बुडाच्या बाजूने कापलेली घागर. कापलेला भाग या घागरीत आतील बाजूस उपडा करून ठेवतात. सादडा, खैर, जांभूळ अशा पेटणाऱ्या झाडांची धपलाटे घागरीत उभी भरतात. यात कापूर, कापूस टाकतात. बाहेरच्या बाजूने अष्टगंध, चंदनाच्या रंगाने छान नक्षी काढतात. रानचाफ्याच्या रंगीत फुलांनी कठा सजवला जातो. सजवलेले हे कठे बिरोबाच्या मंदिरासमोर मांडतात.

# जिल्हा परिषद कृषी विभागाकडून खरीप हंगामाचे नियोजन

ठाणे : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद ठाणेच्या कृषी विभागामार्फत आगामी खरीप हंगामासाठी निविष्ठा नियोजन करण्यात आले असून आवश्यक निविष्ठा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर भात व तूर बियाण्यांची मागणी करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांच्या अडचणी तत्काळ सोडवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष, तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्या आणि भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. ठाणे जिल्ह्यात खरीप हंगामाखाली सरासरी सुमारे ६०,००० हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी भात पिकाखालील सरासरी क्षेत्र ५५,००० हेक्टर आहे. मागील वर्षी ५५,१४३ हेक्टर क्षेत्रावर भात पिकाची लागवड करण्यात आली होती. यंदाच्या हंगामातही सुमारे ५५,००० हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. खत उपलब्धतेबाबत कृषी विभागाने ११,०८८ मेट्रिक टन रासायनिक खतांची मागणी केली असून शासनाकडून जिल्ह्यासाठी ११,५५० मेट्रिक टन खतसाठा मंजूर करण्यात आला आहे. त्यामध्ये युरिया ९,७०० मेट्रिक टन, डीएपी २०० मेट्रिक टन, एमओपी ५० मेट्रिक टन, एसएसपी १०० मेट्रिक टन तसेच संयुक्त खते १,५०० मेट्रिक टन यांचा समावेश आहे. बियाणे उपलब्धतेच्या दृष्टीने जिल्ह्यासाठी एकूण २२ हजार क्विंटल बियाण्यांच्या आवश्यकता असून महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ व खाजगी बियाणे उत्पादक कंपन्या साधारणपणे १५ हजार ते १६ हजार क्विंटल बियाणांचा पुरवठा करणार आहेत.

# महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण कायदे विषयक शिबीराचे आयोजन

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

आज दि:-१५ एप्रिल २०२६ रोजी एस.बी.शेलार जिल्हा न्यायाधीश-१ तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्या मार्गदर्शना खाली दि:-१५ एप्रिल रोजी अनंतराव कणसे होमीओपॅथीक कॉलेज आणि हॉस्पीटल आळे जुन्नर येथे सकाळी ०९:३० ते १०:३० या वेळेत ए.एम.हुसेनदिवाणी वरिष्ठ न्यायाधिश जुन्नर यांच्याअध्यक्षते खाली संपन्न झाले.महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिके नुसार कायदे विषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते सदर शिबीरात जुन्नर तालुका वकील बार असोसिएशन चे अध्यक्ष ॲड. हेमंत हाडवळे उपाध्यक्ष ॲड. निलीमा शेरकर ॲड. वैशाली देवकर ॲड टिंगरे वर्षा ॲड कौशल पादीर ॲड. आदेश घाटपांडे ॲड.सौरव सोनवणे जुन्नर तालुका विधी सेवा समिती समन्वयक प्रशांत मोरतळे तसेच अनंतराव कणसे मेडिकल कॉलेज व हॉस्पीटल चेअरमन डॉ.कमलेश घोलप डॉ.राशी मोरडीया तसेच अनंतराव कणसे मेडिकल कॉलेज व हॉस्पीटलचे डॉक्टर प्राध्यापक विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबीराचे अध्यक्ष ए.एम. हुसेन दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर जुन्नर यांनी कायदेविषयक शिबिराचे औचित्य साधून कॉलेजमध्ये



रॅगींगचे प्रकार असतात रॅगिंग करणे हा दंडात्मक गुन्हा आहे रॅगिंग कॉलेजमध्ये होता कामा नये तसेच कॉलेजमध्ये विशाखा सारख्या समित्या स्थापन करणे आवश्यक आहे प्रत्येकांनी कायद्याचे पालन करावे त्यामुळे सुरक्षा व स्वातंत्र्य मिळते असे प्रतिपादन केले तसेच Awareness on Pre-conception and Prenatal Diagnositc Techniques (Prohibition of Sex Selection) Act,1994. (P.C. and P.N.D.T. Act. या विषयावर ॲड वर्षा टिंगरे Awareness on Protection of Children from Sexual Offences Act, 2012 (POCSO Act) at Schools and Colleges. या विषयावर ॲड कौशल पादीर Awareness programme on the safety and privacy of women in the society, या विषयावर ॲड आदेश घाटपांडे Victim Compensation Schemes. या विषयावर ॲड वैशाली देवकर यांनी मार्गदर्शन केले.

# मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास व्हावा

## आ. काशिनाथ दाते सर : कुरुंद येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

पारनेर : (स. गांवकरी)

सोमवार दि. २० एप्रिल २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात विकासकामांना वेग देत सर्वसामान्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते व प्रमुख उपस्थितीत कुरुंद येथे विविध विकासकामांच्या भूमिपूजनाचा सोहळा संपन्न झाला. या उपक्रमामुळे गावाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी भर पडणार असून, स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



याप्रसंगी आमदार दाते सर म्हणाले की, "विकास हा केवळ कागदावर वा भाषणापुरता मर्यादित न राहता तो प्रत्येक गावापर्यंत आणि गावातील प्रत्येक माणसापर्यंत पोहोचलाच पाहिजे, हा माझ्या आजवरच्या राजकीय वाटचालीतील कायमचा ध्यास आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे हेच माझे खरे ध्येय आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास करताना कुणीही वंचित राहणार नाही. ह्याची मी कायम दक्षता घेत आलोय व घेत राहील." त्यांनी पुढे सांगितले की, शिक्षण, रस्ते, सामाजिक सुविधा आणि धार्मिक स्थळांचा विकास या माध्यमातून ग्रामीण भाग अधिक सक्षम करण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. विकासकामांमध्ये पारदर्शकता व गुणवत्ता राखत कामे वेळेत पूर्ण करण्यावरही आपण कायम भर दिला असून सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावरील समाधानातच माझ्या राजकीय व सामाजिक वाटचालीची फलश्रुती दडलेली आहे.

यावेळी जयसिंगराव कर्डीले, आरपीआय पारनेर तालुका अध्यक्ष राजेंद्र उबाळे, अशोक कर्डीले सर, दशरथदादा कुलाळ, विकास पवार, संतोष डोंबाळे, अर्जुन रासकर, बाबासाहेब कोतकर, मधुकर उबाळे, रघुनाथ भोसले, गौतम गायकवाड, सुधाकर उबाळे, कैलास उबाळे, नंदुशेठ खामकर, कैलास कोठावळे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विकासकामांमुळे कुरुंद गावाच्या प्रगतीला नवी दिशा मिळणार असून, आमदार दाते सरांच्या समाजाभिमुख कार्यपद्धतीमुळे सर्वसामान्यांमध्ये विश्वास अधिक दृढ होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# जागतिक लिव्हर दिनानिमित्त अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचा जनजागृती उपक्रम

नाशिक : (स. गांवकरी)

जागतिक लिव्हर दिनानिमित्त अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे लिव्हरच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला. यावर्षी "Solid Habits, Strong Liver" या संकल्पनेवर भर देत नागरिकांना निरोगी सवयी अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले.



या उपक्रमांतर्गत लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असलेले चार महत्त्वाचे स्तंभ (Four Solid Habits) अधोरेखित करण्यात आले— संतुलित आहार (Balanced Diet), नियमित शारीरिक हालचाल (Physical Activity), मद्यपानाचे मर्यादित सेवन (Reduced Alcohol Intake) आणि नियमित आरोग्य तपासणी (Regular Check-ups). तज्ज्ञांनी सांगितले की, या चार सवयींचा अंगीकार केल्यास लिव्हरशी संबंधित अनेक आजार प्रभावीपणे टाळता येऊ शकतात. याबाबत बोलताना गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजिस्ट डॉ. संदीप पाटील म्हणाले, "लिव्हर हा शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव असून तो पचनक्रिया, विषारी घटकांचे निर्मूलन आणि शरीरातील संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि योग्य जीवनशैली यांच्या माध्यमातून लिव्हरची काळजी घेणे अत्यावश्यक आहे." डॉ. सोहम दोशी यांनी सांगितले, "लिव्हरचे आजार सुरुवातीच्या टप्प्यात बहुतांश वेळा लक्षणांशिवाय वाढतात. त्यामुळे नियमित तपासणी करणे महत्त्वाचे आहे. यासाठी फायब्रोस्कॅन (Fibroscan) ही आधुनिक, नॉन-इनवेसिव्ह तपासणी उपयुक्त ठरते, ज्याद्वारे लिव्हरमधील फॅट आणि फायब्रोसिस अचूकपणे ओळखता येते." डॉ. अमोल शिंदे यांनी नमूद केले, "आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे फॅटी लिव्हर आणि इतर लिव्हर विकार वाढताना दिसत आहेत. अनियमित आहार, जंक फूड, मद्यपान आणि शारीरिक हालचालींचा अभाव हे त्यामागील मुख्य कारणे आहेत. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि निरोगी सवयी अंगीकारल्यास हे आजार मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतात." यानंतर लिव्हर ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. अमोल जाधव म्हणाले, "लिव्हर सिरोसिस हा गंभीर आजार असून, त्याच्या उशिरा टप्प्यात लिव्हर ट्रान्सप्लांटची आवश्यकता भासू शकते. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे लिव्हर ट्रान्सप्लांटसाठी अत्याधुनिक सुविधा आणि अनुभवी तज्ज्ञांची टीम उपलब्ध आहे, ज्यामुळे रुग्णांना नाशिकमध्येच उच्च दर्जाचे उपचार मिळू शकतात." वरिष्ठ GI सर्जन डॉ. संदीप सबनीस यांनी सांगितले, "गत काही वर्षांत जीवनशैलीतील बदलांमुळे नॉन-कम्युनिकेबल आजार—विशेषतः फॅटी लिव्हर, लिव्हर सिरोसिस आणि मेटाबॉलिक विकार—यांचे प्रमाण वाढले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)